**<u>महत्वाचे</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/ ०४/कावि/ ९ /२०२३
दिनांक- १२ / ०७ /२०२३

प्रति,
सर्व संबंधित विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ १८

<u>विषय</u>:- महापालिका संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेबाबत...

संदर्भ:- 1) परिपत्रक क्र. मातंवि/13/कावि/16/2016, दि. 13/01/2016
2) परिपत्रक क्र. मातंवि/13/कावि/77/2016, दि. 01/04/2016
3) परिपत्रक क्र. मातंवि/08/कावि/369/2016, दि. 10/02/2017
4) परिपत्रक क्र. मातंवि/**8**/कावि/113/2018, दि. 14/03/2018
5) परिपत्रक क्र. मातंवि/**8**/कावि/365/2018, दि. 15/09/2018
6) परिपत्रक क्र. मातंवि/04/कावि/18/2021 दि. 27/08/2021
7) परिपत्रक क्र. मातंवि/04/कावि/38/2021 दि. 27/09/2021
8) परिपत्रक क्र. मातंवि/04/कावि/197/2022 दि. 27/05/2022
9) श्री. विशाल तुळशीराम मिठे यांचा दि. 9/1/2023 चा प्राप्त अर्ज

**परिपत्रक,**

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरिकांना महापालिके संबंधित माहिती तत्काळ उपलब्ध होण्याचे दृष्टीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळावर मनपाचे विविध विभागांसंबंधित माहिती (उदा. निविदा, कोटेशन, कामाचे आदेश, करारनामा, विविध योजना, अंतर्गत परिपत्रके व आदेश, नागरिकांना देणेत येणा-या सेवा, RTI अंतर्गत माहितीचे प्रकटीकरण तसेच विभागा संबंधित प्रसिद्ध करणेत आलेली माहिती इ.) प्रसिद्ध करणे व ती अद्ययावत ठेवणे कामी माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत प्रशिक्षण देऊन विभाग निहाय लॉगीन व पासवर्ड उपलब्ध करुन देणेत आलेले आहेत. त्याअनुषंगाने संदर्भिय क्र. १ ते ८ अन्वये सर्व विभागांना त्यांचे विभागाशी संबंधित माहिती प्रसिद्ध / अद्ययावत ठेवणेबाबत वेळोवेळी कळविणेत आलेले आहे.

तथापि असे निदर्शनास आले आहे की, काही विभागांकडुन मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची माहिती प्रसिद्ध / अद्ययावत केली जात नसल्यामुळे नागरिकांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळविणेत येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर आपले विभागाशी संबंधीत निविदा, कोटेशन, कामाचे आदेश, करारनामा, विविध योजना, अंतर्गत परिपत्रके व आदेश, नागरिकांना देणेत येणा-या सेवा, RTI अंतर्गत माहितीचे प्रकटीकरण तसेच विभागा संबंधित विविध प्रसिद्ध करणेत आलेली माहिती तातडीने दिनांक २० / ०७ /२०२३ पर्यत प्रसिध्द करणेत यावी तसेच ती वेळोवेळी अद्ययावत राहील याची दक्षता घ्यावी.

सदरबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे संपर्क साधुन पुनःश्च प्रशिक्षण घेऊन उपरोक्त माहिती संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध / अद्ययावत राहील याची दक्षता घ्यावी.

(निळकंठ पोमण)
मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.